# प्रकरण ६ वे - निष्कर्ष व सूचना

६.१ प्रस्तावना

६.२ प्रकरणांचा सारांश

६.३ निष्कर्ष

६.४ सूचना

६.५ समारोप

संदर्भसूची

# प्रकरण ६ वे
# निष्कर्ष व सूचना

## ६.१ प्रस्तावना :

'जलस्वराज्य प्रकल्पातून विकास : रेंदाळ गावचा विशेष अभ्यास' या विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी काही गृहितके मांडण्यात आली. या गृहितकांचा पाठपुरावा करण्यासाठी मुंबई येथील जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, पुणे येथील विभागीय कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथील जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, रेंदाळ गावातलील प्रकल्प कार्यालयाला भेट दिली. या कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांशी जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामकाजाबाबत चर्चा केली. रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे सहा वेळा भेट देवून पाणीपुरवठा अध्यक्ष शिवाजी पाटील, महिला विकास समिती अध्यक्ष सौ. रंजना डफळे, हिशोबनिस संभाजी वाघे, तांत्रिक सेवा पुरवठादार संजय पाटील, ठेकेदार महादेव पाटील, सहाय्यकारी संस्था क्वॉलिटी मॅनेजमेंटचे अध्यक्ष मुळे यांच्या बरोबर गावात राबविण्यात आलेल्या प्रकल्पाबद्दल सविस्तर चर्चा केली. रेंदाळ येथील ८० ग्रामस्थांकडून प्रश्नावली भरुन घेतली. कोल्हापूर येथील जलस्वराज्य प्रकल्प कार्यालयातील अधिकारी एस.के.कांबळे, टी.जी.पाटील, फ्रान्सिस डिसुझा यांचेकडून जलस्वराज्य प्रकल्प व रेंदाळच्या योजनेची माहिती घेतली. याचबरोबर जलस्वराज्य प्रकल्पाचे संकेतस्थळ, प्रकल्प कार्यालयाकडून प्रकाशित होणाऱ्या पुस्तिका, माहितीपत्रके, मासिक अहवाल या साधनांचा तथ्य संकलनासाठी वापर केला.

प्रस्तुत लघुप्रबंधासाठी नमुना निवड, प्रश्नावली व आशय विश्लेषण या संशोधन पद्धतींचा उपयोग केला आहे. या संशोधनातून काही निष्कर्ष समोर आले. या निष्कर्षांची म्हणजेच गृहितकांच्या सिद्धतेबाबतची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे. त्यांची मांडणी करण्यापूर्वी मागील प्रकरणांचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे संशोधन समजण्यास मदत होईल.

## ६.२ प्रकरणांचा सारांश :

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्वभूमी, जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरुप, जलस्वराज्य प्रकल्पाचे नियम, उद्देश, गरज, अटी, गावस्तरावर प्रकल्प अमंलबजावणीचा कालावधी, महाराष्ट्र राज्यातील जलस्वराज्य प्रकल्प, सहाय्यकारी संस्थांची नियुक्ती व जबाबदारी, विकासाची संकल्पना, विकासासाठी लोकसहभागाची आवश्यकता, महिला सक्षमीकरण या मुद्दयांवर चर्चा करण्यात आली आहे.

दुसरे प्रकरण हे संशोधन पद्धतीचे आहे. प्रस्तुत लघुप्रबंधासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीची माहिती या प्रकरणात आहे. यामध्ये सामाजिक संशोधनाची व्याख्या, संशोधनाच्या पद्धती, संशोधनाचा आराखडा, नमुना निवड, प्रश्नावली, आशय विश्लेषण, संशोधनाच्या मर्यादा, गृहितके, तथ्य संकलन अशी मांडणी केलेली आहे. या प्रकरणामुळे संशोधनाचे चित्र स्पष्ट होते.

तिस-या प्रकरणामध्ये रेंदाळ गावातील जलस्वराज्य प्रकल्पाचे चित्र स्पष्ट होते. या प्रकरणामध्ये रेंदाळ गावची पार्श्वभूमी, जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजनेची माहिती, प्रकल्पातंर्गत निर्माण झालेल्या पाणीपुरवठा योजनेतील सुविधा, रेंदाळमधील जलस्वराज्य प्रकल्प, प्रकल्पासाठी प्राप्त झालेला निधी, प्रकल्प यशस्वी होण्यासाठी राबविलेले विकासाचे उपक्रम याविषयी माहिती दिलेली आहे.

चौथ्या प्रकरणात रेंदाळमधील ८० ग्रामस्थांकडून भरुन घेण्यात आलेल्या प्रश्नावलीची विभागणी, प्रश्नावलीचे विभागवार वर्गीकरण, राबविलेल्या उपक्रमांचे फायदे यांची माहिती दिली आहे.

पाचव्या प्रकरणात रेंदाळमधील ग्रामस्थांकडून भरुन घेतलेल्या प्रश्नावलीचे आशय विश्लेषण केलेले आहे. हा अभ्यास करीत असताना जिल्हा स्तर व गावातील प्रकल्प कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून माहिती घेतलेली आहे. त्यातून काही निष्कर्ष काढलेले आहेत. या प्रकरणांमुळे निश्चित केलेली गृहितके अधिक बळकट होण्यास मदत होईल.

**प्रस्तुत लघुप्रबंधासाठी मांडलेली गृहितके पुढीलप्रमाणे :**

१. जलस्वराज्य प्रकल्पातून रेंदाळ गावचा विकास झाला आहे.

२. लोकसहभागाशिवाय जलस्वराज्य प्रकल्पातून विकास ही संकल्पना प्रत्यक्ष साकारत नाही.

३. रेंदाळ गावात जलस्वराज्य प्रकल्पातून महिलांचे सक्षमीकरण झाले आहे.

## ५.३ निष्कर्ष :

कोल्हापूर जिल्हयातील ११५ ग्रामपंचायतींचा जलस्वराज्य प्रकल्पात समावेश आहे. प्रस्तुत लघुप्रबंधाच्या संशोधनासाठी हातकणंगले तालुक्यातील रेंदाळ या गावाची नमुना म्हणून निवड केली. विकास, लोकसहभाग व महिला सक्षमीकरण या तीन घटकांवर आधारीत प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली ८० ग्रामस्थांकडून भरुन घेतली. जिल्हा कार्यालयातील अधिकारी व रेंदाळ गावातील ग्रामस्थ यांच्याकडून घेतलेल्या माहितीच्या व प्रश्नावलीच्या आधारे लघुप्रबंधासाठी मांडलेली गृहितके सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून सुरु झालेल्या नळपाणीपुरवठा योजनेतून ९४% लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे. लोकांपर्यत शुद्ध, पुरेसे पाणी दररोज पोहचत आहे. उर्वरित लोकांना वैयक्तिक नळ कनेक्शन देण्याचे काम सुरु आहे. पिण्याच्या पाण्याच्या योजनेचे योग्य नियोजन व व्यवस्थापन व्हावे यासाठी रेंदाळने मिटर पद्धतीचा अवलंब केला आहे. जनजागृतीच्या माध्यमातून लोकांना विकासाची प्रक्रिया समजली आहे. प्रकल्पापूर्वी १८.७५% लोकांकडे वैयक्तिक शौचालये होती. प्रकल्प सुरु झाल्यानंतर गाव निर्मल झाले आहे. पाणी आणि स्वच्छता या दोन मुख्य समस्या रेंदाळमध्ये भेडसावत होत्या. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून नियमित पाणीपुरवठा व १००% निर्मलचे उद्दीष्ट रेंदाळने साध्य केले आहे. जलस्वराज्य प्रकल्पामुळे या दोन्ही घटकांबाबत



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

रेंदाळ स्वयंपूर्ण झाले. यावरुन प्रस्तुत लघुप्रबंधासाठी मांडलेले पहिले गृहितक जलस्वराज्य प्रकल्पातून रेंदाळ गावचा विकास
झाला आहे हे खरे ठरते.

२. जलस्वराज्य प्रकल्प हा मागणी व लोकसहभागावर आधारीत प्रकल्प आहे. लोकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे. जलस्वराज्य प्रकल्पात पाणीपुरवठा योजना, स्वच्छता, महिला सक्षमीकरण यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी महिला व सर्वसाधारण ग्रामसभेची मंजूरी आवश्यक आहे. ५०% उपस्थितीचा कोरम पूर्ण असल्याशिवाय ग्रामसभेतील कोणताही ठराव मंजूर होत नाही.
जलस्वराज्य प्रकल्पामध्ये १०% लोकवर्गणीची अट आहे. स्वमालकीची भावना लोकांमध्ये निर्माण होण्यासाठी, लोकांचे योजनेच्या कामावर लक्ष राहण्यासाठी लोकवर्गणी भरणे आवश्यक आहे. लोकवर्गणी गावातील सर्व लोकांकडून गोळा करणे अपेक्षित आहे. जलस्वराज्य प्रकल्पात ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सामाजिक लेखा समिती, महिला विकास समिती या तीन मुख्य समित्या आहेत. या समित्यांमध्ये गावातील सर्व भागातील व घटकातील प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. जलस्वराज्य प्रकल्पाची ध्येयधोरणे, उद्दीष्टये लोकांना समजावीत यासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येते. पाणीपुरवठा योजनेचे साहित्य खरेदी करण्यासाठी समिती सदस्यांबरोबर गावातील महिला व पुरुषांनी जाणे हा जलस्वराज्य प्रकल्पाचा नियम आहे. ग्रामसभा व १०% लोकवर्गणी यावरुन प्रस्तुत लघुप्रबंधासाठी मांडलेले दुसरे गृहितक लोकसहभागाशिवाय जलस्वराज्य प्रकल्पातून विकास ही संकल्पना प्रत्यक्षात साकारत नाही हे सिद्ध होते.

३. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महिलांच्या ग्रामसभेचा समावेश आहे. महिला ग्रामसभेमध्ये किमान ५०% महिलांची उपस्थिती आवश्यक आहे. रेंदाळमध्ये झालेल्या ग्रामसभांमध्ये ७४% महिलांची उपस्थिती होती. यावरुन महिलांना प्रकल्पामुळे आपल्या अधिकारांची व कर्तव्याची जाणीव झाली आहे हे लक्षात येते. जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत गरीब व गरजू

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचतगटांची स्थापना करण्यात आली. सध्या गावातील ७०% महिला बचतगटात सहभागी झाल्या आहेत. प्रशिक्षणे, कार्यशाळा यांचा ८५% महिलांनी लाभ घेतला. यावरुन महिलांच्या विकासासाठी जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून देण्यात आलेला संदेश पोहचला हे लक्षात येते. महिलांनी स्वत:च्या उद्योग व्यवसाय सुरु करावा यासाठी बिजभांडवल वाटप करण्यात आले. ५५% महिलांनी या बिजभांडवलाचा योग्य प्रकारे वापर केला. यावरुन महिलांचे आर्थिक सक्षमीकरण झाले आहे हे लक्षात येते. रेंदाळमधील महिलांनी पाणीपट्टी वसूलीचे काम स्विकारले आहे. १५ लाख वार्षिक पाणीपट्टी रेंदाळमधून जमा होणार आहे. पाणीपट्टी वसूलीचे काम ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या ठरावाने बचतगटाकडे सोपविले आहे. यावरुन रेंदाळमधील महिला ३ कोटी ८० लाखाची योजना चालविण्यासाठी सक्षम झाल्या आहेत असे ग्रामस्थांना वाटते हे लक्षात येते. ४०० महिला संगणक साक्षर बनल्या आहेत. सॅनिटरी नॅपकिन तयार करण्याचा व्यवसाय रेंदाळमध्ये सुरु झाला आहे. यावरुन आरोग्याबाबत महिला जागृत असल्याचे समजते. प्रकल्पामुळे महिलांना व्यवसाय प्राप्त झाला, धाडस वाढले, आपल्या अधिकार व कर्तव्यांची जाणीव झाली, सामाजिक दर्जा वाढला यावरुन रेंदाळ गावात जलस्वराज्य प्रकल्पातून महिलांचे सक्षमीकरण झाले आहे हे प्रस्तुत लघुप्रबंधासाठी मांडलेले तिसरे गृहितक खरे ठरते.

## ६.४ सूचना :

जागतिक बॅंकेच्या मदतीने महाराष्ट्रात २००२ पासुन जलस्वराज्य प्रकल्प सुरु झाला. सुरवातीला प्रायोगिक तत्वावर तीन जिल्हयांमध्ये प्रकल्प राबविण्यात आला. त्याला मिळालेले यश पाहून हा प्रकल्प राज्यातील २६ जिल्हयांमध्ये सुरु करण्यात आला. महाराष्ट्र शासनाचे अधिकारी, कंत्राटी तज्ञ, गावस्तरावरील विविध समित्या यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात आला. महाराष्ट्रातील ८०% ग्रामपंचायतींमध्ये आज पाणीपुरवठा सुरु

आहे. परंतु एक संशोधक म्हणून जलस्वराज्य प्रकल्पाचे उद्देश अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी काही सूचना कराव्याशा वाटतात. त्या पुढीलप्रमाणे :-

१. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक हा शासनाचा जबाबदार अधिकारी असतो. शासकीय योजना गावाच्या विकासासाठी तो राबवित असतो. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये ग्रामसेवकाला डावलण्यात आलेले आहे. ग्रामसेवकाला प्रकल्पात सहभागी करुन घेतले तर कागदपत्रांची पुर्तता, संवादातील गतिमानता या गोष्टी अधिक प्रभावी झाल्या असत्या असे वाटते.

२. जलस्वराज्य प्रकल्पात समित्यांची निवड करताना सदस्याचे शिक्षण, तांत्रिक किंवा सामाजिक घडामोंडीबाबतचे ज्ञान या गोष्टी विचारात घेऊन सदस्यांची निवड केली तर त्यांच्या ज्ञानाचा उपयोग प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी होईल असे वाटते.

३. महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांची निवड करताना त्यांना बचतगटांच्या दप्तराचे लिखाण, पैशाचे हिशोब, बॅंकांचे व्यवहार याबाबतचे किमान ज्ञान असलेल्या महिलांची निवड केली तर महिला सक्षमीकरणाचे काम अधिक चांगले होईल असे वाटते.

४ जलस्वराज्य प्रकल्पात जिल्हा कार्यालयात कागदपत्रांचा व्याप खूप मोठा आहे असे वाटते. दप्तरातील काही गोष्टी ग्रामीण भागातील लोकांना समजत नाहीत. त्यांना समजेल अशा भाषेत कागदपत्रांच्या पूर्ततेचे काम व्हावे असे वाटते. कामापेक्षा कागदपत्रांना जास्त महत्व दिले गेल्यामुळे लोकांमध्ये कामाच्या बाबतीत अनास्था निर्माण होते.

## ६.५ समारोप :

जलस्वराज्य प्रकल्प हा मागणी आधारीत प्रकल्प आहे. लोकांमध्ये स्वमालकीची भावना निर्माण झाली तर गावातील विकासकामे जलद गतीने होतील तसेच ग्रामस्थांचे त्यावर नियंत्रण असल्यामुळे या योजना शाश्वत टिकतील या शासनाच्या विचारातून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दुर करण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्प सुरु करण्यात आला. या प्रकल्पामुळे लोकसहभाग व महिलांच्या सहभागातून विकासाची संकल्पना गावात रुजली.

संपूर्ण जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास हा बराच मोठा विषय असल्यामुळे कोल्हापूर जिल्हायतील हातकणंगले तालुक्यातील रेंदाळ या गावचा अभ्यास करण्यात आला. त्यानिमित्ताने संपूर्ण जलस्वराज्य प्रकल्प समजून घेता आला. गृहितके मांडून ठोस निष्कर्ष काढण्यात आले. या अभ्यासाचा उपयोग विकास, लोकसहभाग किंवा शासकीय योजना या घटकांवर आधारीत विषयांवर संशोधन करणाया संशोधकांना होऊ शकेल असे वाटते.

# संदर्भसूची


१. जलस्वराज्य प्रकल्पाची माहितीपुस्तिका - पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन - पान नं. २

२. जलस्वराज्य प्रकल्पाची माहितीपुस्तिका - पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन - पान नं. ५

३. घडीपत्रिका - जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर .

४. माहितीपत्रिका - जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर .

५. Govt. Online C. P. R. System - RSPMU - Mumbai - 16th March 2009

६. डॉ. धारुरकर वि. ल. - विकास संवादाची नवी क्षितीजे - चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद , २६ जानेवारी १९९९, पान नं. १३,१४

७. www.worldbank.org - website - 10/12/08

८. प्रा. घाटोळे रा. ना.- समाजशास्त्रीय संशोधन - तत्वे व पद्धती - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती सातवी, पान नं. ५

९. डॉ. भांडारकर पु. ल. - सामाजिक संशोधन पद्धती - महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, आवृत्ती तिसरी, पान नं. १०

१०. डॉ. पाटील वा. भा. - संशोधन पद्धती - मंगेश प्रकाशन, नागपूर - १९९८, पान नं.

११. ओडियार सुशिला - सामाजिक संशोधन, तत्वे व पद्धती, मेहता प्रकाशन, कोल्हापूर, पान नं. ११, १२

१२. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - सामाजिक संशोधन पद्धती - फडके प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती दुसरी, १९८६ , पान नं. १०२

१३. डॉ. संत दु. का. - संशाधन पद्धती प्रक्रिया व अंतरंग - डॉ. ग. श्री. कोशे, पुणे

विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे, १९८८, पान नं. ९६,९७

१४. पाटील संजय- तांत्रिक सेवा पुरवठादार, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेशी चर्चा, दि. ०९/११/०८

१५. आर.एस.भोजे - ग्रामसेवक रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेकडून दि. ११/०९/०८ रोजी घेतलेली माहिती

१६. लेखा शाखा, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, कोल्हापूर

१७. मंजूर गावकृती आराखडा, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, दि. ३०/०६/०६

१८. Monthly Progress Report, Jalswarajya Project, Zilla Prishad, Kolhapur , Dec.2007 & August 2008

१९. अजित पवार, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री यांची मुलाखत, महाराष्ट्राची निर्मलतेकडे वाटचाल - लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई, नोव्हेंबर २००८ , पान क्रं. १६

२०. अजय जाधव- जलस्वराज्य एक विचार - लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई, डिसेंबर २००७, पान नं. २४, २५

२१. महिला सक्षमीरणासाठी उपप्रकल्प ३ अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचे अहवाल, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

२२. शासन अध्यादेश / परिपत्रक, क्र. दि.

२३. ४० पुरुष व ४० महिला उत्तरदात्यांकडून भरण्यात आलेली प्रश्नावली, दि. २६/०२/०९ व दि.०५/०३/०९

२४. तथ्य संकलनासाठी तयार करण्यात आलेली प्रश्नावली

२५. पाटील शिवाजी , पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष, ग्रा.पं. रेंदाळ यांचेशी चर्चा, दि. २६/०२/०९

२६. महिला बचतगटांशी चर्चा, ग्रा.पं. रेंदाळ, दि. ३१/०४/०९

२७. रेंदाळ गावची प्रत्यक्ष पाहणी दि. ११/०९/०८ व ३१/०४/०९



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# परिशिष्ट

१. जलस्वराज्य प्रकल्पाचे बोधचिन्ह व बोधवाक्य

२. नकाशा - जलस्वराज्य प्रकल्प राबविणारे महाराष्ट्रातील जिल्हे

३. कोल्हापूर जिल्हयाचा नकाशा

४. प्रश्नावली : तथ्य संकलनाचे एक माध्यम

५. प्रसारमाध्यमांना प्रकल्पाची माहिती देताना महिला

६. छायाचित्रे - ग्रामसभा, निर्मलग्राम, पाणीपुरवठा योजनेची उपांगे, महिलांनी सुरु केलेले उद्योग व्यवसाय, प्रशिक्षण कार्यक्रम, मिटर पद्धतीचा अवलंब.